# ॥ परिकथेंतिल राजकुमारा ॥

परिकथेंतील राजकुमारा स्वप्नीं माझ्या येशिल का?
भाव दाटले मनीं अनामिक साद तयांना देशिल का ? ॥धृ.॥

या डोळ्यांचे गूढ इषारे
शब्दांवांचुन जाणुन सारें
राणी अपुली मला म्हणोनी तुझियासंगें नेशिल का ? ॥ १॥

मूर्त मनोरम मनीं रेखिली
दिवसारात्रीं नित्य देखिली
त्या रूपाची साक्ष जिवाला प्रत्यक्षांतुन देशिल का ? ॥ २॥

लाजुन डोळे लवविन खालीं
नवख्या गालीं येइल लाली
फुलापरी ही तनू कापरी हृदयापाशीं घेशिल का ? ॥ ३॥

लाजबावरी मिटुन पापणी
साठवीन तें चित्र लोचनीं
नवरंगी त्या चित्रामधलें स्वप्नच माझें होशिल का ? ॥४॥

कवयित्री वंदना विटणकर

संगीतकार अनिल मोहिले
गायिका कृष्णा कल्ले

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 18, 1999